क्र.२/नसचि/प्रशासक/ १३ /२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०७ फेब्रुवारी, २०२४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १३/२०२३-२०२४

## सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **बुधवार दि.०७/०२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

### परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१९/०१/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महापालिका क्षेत्रातील महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये सुरु असलेल्या बालवाडीचे अंगणवाडीमध्ये रुपांतर करणेस मान्यता देणे. **उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.०७/०२/२०२४ चे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १३/२०२३-२४ दिनांक :- ०७/०२/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१३ दि.०७/०२/२०२४ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दुपारी ०४.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | उपस्थितांची नावे | अ. क्र. | उपस्थितांची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री.सुनिल पवार – प्रशासक | २. | श्री.राहुल रोकडे - उपायुक्त,सांगली |
| ३. | श्री.पंडीत पाटील – उपायुक्त मालमत्ता कर व इतर | ४. | श्री.वैभव साबळे – उपायुक्त, मालमत्ता व्यवस्थापन |
| ५. | श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक | ६. | श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता |
| ७. | श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड | ८. | श्री.मेंगडे – मुख्य लेखाधिकारी |
| ९. | श्री.रविंद्र ताटे - वैद्यकिय आरोग्याधिकारी (आरोग्य) | १०. | श्री.अशोक माणकापुरे – प्रशासकीय अधिकारी |
| ११. | श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स. क्र.१ | १२. | श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२ |
| १३. | श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३ | १३ | श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि. |
| १४. | श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४ | १५. | श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली |
| १६ | श्री.पी.एम.हलकुडे- नगर अभियंता, सांगली. | १७ | श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष |
| १८ | श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि. | १९ | श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड |
| २० | श्री. अमरसिंह चव्हाण – विद्युत अभियंता | २१ | श्री.आठवले – प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग |
| २२. | श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क अधिकारी / विधी वि.अधि. | २३. | श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक |
| २४ | श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर | २५. | श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी |
| २६. | श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजिनिअर वर्कशॉप मिरज. | २७. | श्री. सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी पा.पु. |
| २८. | श्रमती. ज्योती सरवदे – एन.यु.एल.एम. | २९. | श्री.अमजद जेलर – क्रिडा अधिकारी |

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

| | |
|---|---|
| विषय क्र. ०१ | मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१९/०१/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे. |
| प्रशासक | विषय मंजूर |
| विषय क्र. ०२ | महापालिका क्षेत्रातील महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये सुरु असलेल्या बालवाडीचे अंगणवाडीमध्ये रुपांतर करणेस मान्यता देणे |
| प्रशासक | महानगरपालिकेच्या किती बालवाड्या आहेत ? |
| प्रशासन अधिकारी शिक्षण | ६४ बालवाड्या आहेत. शासन निर्णयानुसार बालवाड्यांचे अंगणवाडीत रुपांतर करणेसाठी यापुर्वी महासभेकडे प्रस्ताव दिलेला होता परंतू महासभेने प्रस्ताव रद्द केला होता. |
| प्रशासक | शासन निर्णय असेल तर शासन निर्णयानुसार कार्यवाही ठेवणे गरजेचे आहे. |
| मुख्य लेखापरिक्षक | बालवाड्या अंगणवाडीमध्ये रुपांतर झाल्यास महानगरपालिकेचा बालवाडी सेविकांच्या पगारावरील खर्च वाचेल. |

| | |
|---|---|
| उपायुक्त मुख्यालय | पगारावरील खर्च वाचेल त्या बरोबरच बालवाडी अंगणवाडीमध्ये रुपांतरीत झाल्यामुळे मुलांना अंगणवडीचा खाऊ सुध्दा मिळेल. |
| प्रशासक | बालवाड्यांमधील लाईट बिल, पाणी बिल, याची जबाबदारी बाल विकास प्रकल्प विभागाची राहील. तसेच अंगणवाडीतील मुलांना महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये घालण्याची अट घालण्यात यावी व इतर अनुषंगिक बाबींबाबत नियमानुसार प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांनी रितसर सामंजस्य करार करावा. |
| प्रशासक | विषय मंजुर. |

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०७/०२/२०२४

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १३/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक** :- ७६ **दिनांक :- ०७/०२/२०२४**

**विषय क्रमांक :- ०१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१९/०१/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.६८ ते ७५ चे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रमाणित

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १३/२०२३-२४

**सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :-** ७७७ **दिनांक :- ०७/०२/२०२४**

**विषय क्रमांक :- ०२**

सोबतचे उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.०७/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील महानगरपालिका कार्यक्षेत्रात महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये एकूण ६४ बालवाड्या सरु आहेत. सदर बालवाड्यांमध्ये अंदाजे १४७२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर बालवाडी सेविकांना दर महा ६०००/- मात्र प्रमाणे मानधन आदा करणेत येत आहे. मा.महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावी-२०१२/प्र.क्र.४२९/का.६ दिनांक १३/०८/२०१४ अन्वये राज्यात ज्या ठिकाणी नविन अंगणवाड्या सुरु करण्यात येतील आशा ठिकणी पुर्वी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, महानगरपालिका, नगरपालिका व कंन्टेन्मेंट बोर्ड, समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग, केंद्रीय व राज्य समाज कल्याण सल्लागार बोर्ड यांच्या बालवाड्या सुरु असतील तर, सदर बालवाडी बंद करण्यात येवुन जर बालवाडी शिक्षीका १० वी. उत्तीर्ण असेल तर तीला अंगणवाडी सेवीका या पदावर नियुक्ती करण्यात यावी व १० वी. उत्तीर्ण नसेल तर बालवाडी शिक्षिकेला अंगणवाडी मदतनीस म्हणून नियुक्ती देण्यात यावी असे नमुद आहे. उक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये सुरु असलेल्या ६४ बालवाड्यांची अंगणवाडीमध्ये रुपांतर करण्यास ही सभा मान्यता देत असुन सदर सदरकामी प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ यांनी रितसर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे समवेत सामंजस्य करार करुन नियमोचित कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशीत करित आहे.

(सुनिल पवार)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग.

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका